**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेशकुमार महादेव कांबळे
म्हैसाळ वेस, पंचशीलनगर, मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी (आस्था),
सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४४+६४५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली प्रतिनिधी श्री.वाय.बी.माळी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी (आस्था), सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली श्री.अविनाश पाटणकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.६.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याकडून शुल्क भरून घेऊनसुध्दा पूर्ण माहिती देण्यात आली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.महेशकुमार महादेव कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे.

माहिती तयार करण्यात आली होती, परंतु संबंधित लिपिकाकडून ती पाठविण्यास विलंब झाला. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून श्री.कांबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जिल्हा सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी शुल्क भरून माहिती देण्याचा आदेश दिला. माहिती देण्याबाबत केलेली कार्यवाही व विलंबाबाबतचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांनी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु पूर्वीच माहिती देण्यात आली असल्याचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केला. राज्य माहिती आयोगाच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी पुन्हा माहिती देण्याचे मान्य करण्यात आले व त्यानुसार तीन दिवसात माहिती देण्यात आली, असा अहवाल दि.२३.६.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा

प्रशासकीय अधिकारी, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जे.व्ही.नाईक यांनी आयोगाला सादर केला. विहित मुदतीत अहवाल सादर न केल्याबद्दल प्रशासकीय अधिकारी श्री.जे.व्ही.नाईक यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १०.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक सोपानराव जगताप . अपीलकर्ता
मु. जिरेगाव, पो. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार दौंड, ता. दौंड, जि. पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.६.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. दिपक सोपानराव जगताप, मु. जिरेगाव, पो. कुरकुंभ, ता.दौंड, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार दौंड, ता. दौंड, जि. पुणे, श्री. प्रशांत शांताराम आवटे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड, ता. दौंड, जि. पुणे, श्री. निलप्रसाद चव्हाण | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००७ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या विहिरीची ७/१२ वर नोंद करावी, या मागणीनुसार योग्य कार्यवाही करण्यात आली नाही. विहिरीचे क्षेत्र आपल्या हद्दीत येत नसल्याचे कोणत्या कायद्यान्वये, कोणत्या कलमान्वये ठरविले याची माहिती दिली नाही. भूमि अभिलेख कार्यालयाने तेथे ओढा व पाणलोट क्षेत्र असल्याचा निर्णय दिला. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी अपील मागे घेण्याबाबत आपल्याला धमकावले, त्याबाबत कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता यांनी केले.

श्री. जगताप यांना अशा प्रकारे धमकावण्याचा कोणताही प्रकार घडलेला नाही. क्षेत्राबाबत फेरचौकशी करावी, अशी मागणी श्री. जगताप यांनी लेखी व तोंडी केली आहे. त्यानुसार तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या कार्यालयाच्या मदतीने फेरचौकशी करून विहिरीच्या नोंदीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड, ता. दौंड श्री. डी.डी.काळे यांनी केले.

श्री. जगताप यांना त्यांच्या मूळ मागणीबाबत केलेल्या कार्यवाहीची नेमकी माहिती देऊन पंधरा दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, दौंड श्री.प्रशांत शांताराम आवटे यांनी दि. १८.८.२००८ च्या पत्रान्वये कार्यवाही केली, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, दौंड यांनी संबंधित नोंदीच्या ७/१२ उताऱ्यासह दि. ७.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अहवाल सादर करण्यास झालेल्या विलंबाबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. डी.डी.काळे यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १७.१२.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय परमेश्वर घोडके
मु.पो.हन्नुर, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६७+६६८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय परमेश्वर घोडके
मु.पो.हन्नुर, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर श्री.पी.एस.ढगे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर विद्यमान-श्री.व्ही.सी.बावकर,
तत्कालीन श्री.आर.एल.बिडला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता हजर न राहिल्याने दि.३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

फेरफार नोंदीबाबत आपल्याला चुकीची माहिती दिली. न्यायप्रविष्ट बाब असताना फेरफार नोंद केली, तसेच खोटा जबाब नोंदविला. चार नावे असताना एकाला नोटिस देऊन सर्व नावे कमी केली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संजय परमेश्वर घोडके यांनी केली.

श्री.घोडके यांना त्यांच्या अर्जानुसार सर्व माहिती देण्यात आली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर पुन्हा माहिती देण्यात आली. तसेच फेरफारातील नोंदी दुरूस्त करण्याबाबतची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. त्याबाबत योग्य त्या न्यायालयात त्यांनी अपील दाखल करावे, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात सूचित केले आहे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.आर.एल.बिडला व जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर विद्यमान-श्री.व्ही.सी.बावकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. श्री.घोडके यांना देऊ केलेली माहिती त्यांनी नाकारली. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांची जबाबदारी होती किंवा नाही, अशा स्वरूपाची विचारणा त्यांनी केली आहे. त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय स्वरूपाची असल्यामुळे अपील

निर्णयात तसे स्पष्ट करण्यात आले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.पी.एस.ढगे यांनी केले.

श्री.घोडके यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि सर्व संबंधितांना नोटिसा दिल्या होत्या की नाही, तसेच नोंदीतील बदल कशाच्या आधारे झाला, याची माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. विषयांकित प्रकरणातील मूळ संचिका अवलोकनासाठी श्री.घोडके यांना उपलब्ध करून द्यावी व आवश्यक असल्यास कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.घोडके यांना मूळ संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन त्यामधील माहिती त्यांना देण्यात आली, असे श्री.घोडके यांची पोहोच असलेल्या पत्राच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.पी.एस.ढगे यांनी दि.१४.७.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विवेक प्रभाकर पंडित
१७१, गोल्डफिंच पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विवेक प्रभाकर पंडित
१७१, गोल्डफिंच पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.सु.द.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एस.ए.गुडनाळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००७ |
| ८ | माहिती मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्थेमधील पात्र-अपात्र संदस्यांबाबतचे निर्णय जिल्हाधिका-यांनी कोणत्या कायद्यान्वये व कोणत्या तरतुदीनुसार दिले, संस्थेला जमीन देताना आदेश दिले; परंतु काढून घेताना आदेश दिले नाहीत, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी आधी दिली नाही व नंतर खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली, त्यामुळे आपले कधीही न भरून येणारे नुकसान झाले. म्हणून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विवेक प्रभाकर पंडित यांनी केली.

श्री.पंडित यांनी खुलाशाची मागणी केली होती. कायद्यातील तरतुदींबाबतची त्यांना हवी असलेली माहिती संबंधित आदेशात असून अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या चौकशी अहवालाची प्रतही त्यांना देण्यात आली. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडील सुनावणीच्या वेळी या प्रकरणातील सर्व मूळ संचिका श्री.पंडित यांना दाखवून त्यांना आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.एस.ए.गुडनाळे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. योग्य ती कार्यवाही करण्यात आली असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.सुरेश जाधव यांनी केले.

जमीन काढून घेण्याबाबतची नेमक्या कायदेशीर तरतुदींची माहिती अपीलकर्त्यास स्वतंत्रपणे देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती दिल्याचे संबंधित पत्राच्या प्रतींसह जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी आयोगास अवगत केले. जिल्हाधिकाऱ्यांचा मूळ आदेश कायदेशीर की बेकायदेशीर, कार्यवाही योग्य की अयोग्य, हे श्री.पंडित यांचे मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश राजाराम तुंगारे — अपीलकर्ता
राघवेंद्र नगर, खराडी, स.नं.३५, प्लॉट नं.८८,
चंदननगर, पुणे-१४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे जिल्हा साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७४ / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | दि. २६.११.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. रमेश राजाराम तुंगारे
राघवेंद्र नगर, खराडी, स.नं.३५, प्लॉट नं.८८,
चंदननगर, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे जिल्हा
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५
श्री. सुनिल देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, पुणे श्री. विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दख्खन पाटबंधारे मंडळ (मध्य) सहकारी गृहरचना संस्था (म) एरंडवणे, पुणे या संस्थेत भ्रष्टाचार झाल्याची तक्रार करुन त्याबाबत आपण अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती मागितली होती, परंतु कायम स्वरूपी ठेवण्याचे दप्तर गहाळ झालेले आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रमेश राजाराम तुंगारे यांनी केली.

श्री. तुंगारे यांनी या विषया संदर्भात विविध पातळ्यांवर वेळोवेळी अर्ज केले असून राज्य माहिती आयोगाकडेही अपिले केली आहेत. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली. अर्जात त्यांनी खुलाशाची मागणी करणारे प्रश्न विचारले आहेत, त्याबाबत माहिती दिली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे श्री. विनायक कोकरे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री. सुनिल देशमुख यांनी केले.

माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विलंबाच्या स्पष्टीकरणासह तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे श्री. ए.एल. घोलकर (सध्या जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड ) यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. घोलकर यांनी दि. ५.१.२००९ च्या पत्रान्वये सविस्तर खुलासा सादर केला. या विषयात उप लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे-१ व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे या दोन कार्यालयाकडील पाच दोषी कर्मचाऱ्यांना दंड केला असून एक महिन्याच्या आत श्री. तुंगारे यांना माहिती देण्याचे आदेश दिले होते. परंतु त्यापूर्वीच संस्थेचे तत्कालीन सचिव श्री. शिवदास साळुंखे यांच्याकडून माहिती प्राप्त करून घेऊन श्री. तुंगारे यांना दिली, असा सविस्तर अहवाल श्री. घोलकर यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या प्रयत्नाच्या तपशिलासह दि. ५.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ११ .१२.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. रामचंद्र राघु निंबाळकर
पौड फाटा रोड, केळेवाडी, स.नं.४४,
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे-३८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग मुळशी
पौड पंचायत समिती, ता.मुळशी, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग मुळशी
पौड पंचायत समिती, ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७८/२००९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०५.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.०६.२००९ |
| ४ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामचंद्र राघु निंबाळकर यांच्या अपिलाची पोच व नोंदणी क्रमांक श्री.निंबाळकर यांना आयोगाचे पत्र दि.१७.०८.२००९ अन्वये पाठविण्यात आली. तसेच या पत्राची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात आली होती.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग मुळशी पौड पंचायत समिती, ता.मुळशी, जि.पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.आंध.वशी/उपविमु/५७७/०९,

दि.१७.०८.२००९ अन्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये श्री.निंबाळकर यांनी माहिती व्यक्तीशः मागितली होती. तथापि त्यांनी या कार्यालयाशी संपर्क साधला नाही व त्यांनी त्यांचा स्वतःचा भ्रमणध्वनी बंद करुन ठेवला होता. तरी सदरची माहिती दि.१०.०७.२००९ रोजी तयार असताना श्री.निंबाळकर यांनी दि.२१.०७.२००९ रोजी ताब्यात घेतली, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले असून सोबत सदर माहितीची छायांकित प्रत व त्यावर माहिती मिळाल्याची श्री.निंबाळकर याची पोच / स्वाक्षरीसह सादर केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : ३० /१२/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास मारूतीराव पाटील
मु.पो.कुरूल, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, कुरूल,
ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्रीमती मनीषा देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, कुरूल,
ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.ए.एम.पठाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.विलास मारूतीराव पाटील यांनी जलस्वराज्य योजनेतील कामांची माहिती मागितली होती. माहिती दिल्यास गैरव्यवहार उघडकीस येईल म्हणून माहिती दिली नाही, असे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले.

संबंधित माहिती ग्रामसभेने नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष म्हणून सरपंचांकडे असून त्यांनी प्रकरण न्यायप्रविष्ट केले असल्यामुळे न्यायालयाच्या निकालापर्यंत दप्तर हस्तांतरण करता येणार नाही असे त्यांना कळविले. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी कुरूल, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.ए.एम.पठाण व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्रीमती मनीषा देसाई यांनी केले. संबंधित माहिती न्यायालयाकडून मागवून घेऊन अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक शंकर भोसले
इस्लामपूर (सरनोबत बंगला),
जावडेकर हायस्कुलच्या पाठीमागे,
ता.वाळवा, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद सांगली, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,
शिवराज विद्यालय व ज्यूनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,
ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०७/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** -श्री.अशोक शंकर भोसले<br>इस्लामपूर (सरनोबत बंगला),<br>जावडेकर हायस्कुलच्या पाठीमागे,<br>ता.वाळवा, जि.सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद सांगली, जि.सांगली तर्फे प्रतिनिधी श्री.ए.जी.मगदूम<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक,<br>शिवराज विद्यालय व ज्यूनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,<br>ता.वाळवा, जि.सांगली श्री.रघुनाथ रामराव पाटील | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.०४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.०७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.१०.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे आपण १९९८-२००७ पर्यंत अध्यापन करीत असून सेवापुस्तक व गोपनीय अहवालांच्या प्रती मागणी करुनही दिल्या जात नाहीत. म्हणून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अशोक शंकर भोसले यांनी केली. समाजशास्त्र विषयाचा एप्रिल २००७ मधील इ.११ वीच्या परीक्षेचा ३०० गुणांचा निकालही आपल्याला दिला नाही, अशीही तक्रार त्यांनी केली.

श्री.भोसले तासिका तत्त्वावर शिकविण्याचे काम करीत होते. त्यामुळे सेवापुस्तक व गोपनीय अहवाल लिहिलेले नाहीत. तसे त्यांना विहित मुदतीत कळविले होते. समाजशास्त्र विषयाच्या निकालाची माहिती त्यांनी मूळ अर्जात मागितली नव्हती. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी त्यांनी ती नमूद केली व त्यानुसार आठ दिवसांत त्यांना ती माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली श्री.रघुनाथ रामराव पाटील यांनी केले. गोपनीय अहवाल वर्षाचे वर्षाला लिहिणे जाणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद सांगली, जि.सांगली यांचे प्रतिनिधी श्री.ए.जी.मगदूम यांनी केले. त्यानुसार अपीलकर्ता श्री.अशोक शंकर भोसले यांच्या गोपनीय अहवालाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली श्री.रघुनाथ रामराव पाटील यांनी ३ दिवसांत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व

ज्युनिअर कॉलेज, ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली श्री.रघुनाथ रामराव पाटील यांनी अद्याप अहवाल सादर केलेला नाही. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विलंबाच्या खुलाशासह जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,शिवराज विद्यालय व ज्यूनिअर कॉलेज ऐतवडे खुर्द,ता.वाळवा, जि.सांगली श्री.रघुनाथ रामराम पाटील तथा यांनी दि.१५.०१.२०१० पर्यंत आयोगाला सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दिनांक : २९/१२/२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. बंडोपंत मायाप्पा ढेंबरे
मु.राजोबाचीवाडी, पो.माडग्याळ,
ता.जत, जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जिल्हा सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जिल्हा सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१० / सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि. २०/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४/५/२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/०८/२००७ |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-</u>**<br>माहिती- मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. बंडोपंत मायाप्पा ढेंबरे हे मयत झाले असल्याबाबतचा मृत्यूदाखला ग्रामसेवक, ग्रामपंचायत सोन्याळ ,ता.जत, जिल्हा सांगली यांनी दि. २/१२/२००९ रोजी आयोगास सादर केला .

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१८-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.व्यंकटेश हणमंतू तट्टे
१७७०, दत्तनगर, सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका/सचिव,
सरस्वती तिमप्पा बालक मंदिर, ४४४-४५ माधवनगर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.व्यंकटेश हणमंतू तट्टे
१७७०, दत्तनगर, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर प्रतिनिधी
श्री.एस.वाय.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका/सचिव,
सरस्वती तिमप्पा बालक मंदिर, ४४४-४५ माधवनगर, सोलापूर
श्रीमती यु.जे.बिटला

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.३०.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

तिमप्पा बालक मंदिर, सोलापूर या बालवाडीकडील १६ पैकी फक्त ४ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका/सचिव, सरस्वती तिमप्पा बालक मंदिर ४४-४५ माधवनगर, सोलापूर यांनी दिली. अन्य मुद्दयांची माहिती मिळाली नाही. तसेच गैरप्रकारांबाबत संस्थेवर कारवाई झाली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.व्यंकटेश हणमंतू तट्टे यांनी केले.

श्री.तट्टे यांनी सन २००४ ते २००७ या काळातील विस्तृत माहिती मागितली होती. न्याती संस्थेच्या विश्वस्त संस्थेमार्फत बालवाडी चालविली जाते व ती शासनमान्य अनुदान प्राप्त नाही, त्यामुळे माहितीचा अधिकार अधनियम २००५ लागू होत नसल्याचे त्यांना मुदतीत कळविले. मात्र अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी माहिती निःशुल्क देण्याचा आदेश दिल्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. लेखापरीक्षण अहवाल व संस्थेशी संबंधित कागदपत्रे मिळण्यास झालेल्या विलंबामुळे ऊर्वरित माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका/सचिव, सरस्वती तिमप्पा बालक मंदिर ४४-४५ माधवनगर, सोलापूर श्रीमती यु.जे.बिटला यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुशांत सुभाष मोरे
३४, पंतांचा गोट, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुशांत सुभाष मोरे
३४, पंतांचा गोट, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, जि.कोल्हापूर श्री.ए.पी.जोगदंड

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा श्री.ए.एस.नलवडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.२२.८.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील नोकर भरतीबाबतची माहिती वारंवार मागणी करूनही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुशांत सुभाष मोरे यांनी केली.

आपल्या बँकेला शासकीय भागभांडवल नाही, शासनाचे कोणतेही अर्थसहाय्य अथवा कर्जाला हमी नाही. रिझर्व बँक, नाबार्ड आदि संस्थांनीही आपल्या बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे कळविले असून तशी भूमिका बँक सातत्याने प्रत्येक अपिलात घेत आली आहे. मात्र त्याबरोबरच माहिती देण्याची भूमिकाही बँकेने ठेवली आहे, हे प्रशंसनीय आहे. त्यानुसारच पारदर्शकतेचा भाग म्हणून अपीलकर्ता श्री.सुशांत सुभाष मोरे यांना संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करू द्यावे व आवश्यक असणाऱ्या नेमक्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्ता श्री.मोरे, श्री.जगदाळे व श्री.पाटील हे बँकेला नाहक त्रास देण्याच्या उद्देशाने वारंवार अशा स्वरूपाचे अर्ज व तक्रारी करीत असतात. यापूर्वी त्यांना समक्ष माहिती देण्यात आली. आयोगाच्या आदेशानुसार अभिलेख दाखविण्याची तयारीही दर्शविली. परंतु अभिलेख पहावयाचे नसून मागितलेल्या माहितीच्या सत्यप्रतीच मिळाल्या पाहिजेत, असा त्यांचा आग्रह आहे. माहिती पाहण्यास ते आले

नाहीत, असे सविस्तर निवेदन बँकेचे सरव्यवस्थापक श्री.ए.एस.नलावडे यानी दि.५.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**